# राशिभविष्य - सप्टेंबर, २०२२.

**दादा दामले (dadadamle@gmail.com)**

==================================================================

**सूचना - प्रत्येक राशीच्या राशिभविष्याच्या अखेरीस त्या त्या राशीच्या जन्मनक्षत्रांसाठी असलेला तारक मंत्र दिला आहे. आपल्या जन्मनक्षत्राच्या तारक मंत्राचा उपाय म्हणून मनापासून श्रद्धेने उपयोग केल्यास जीवनात येणाऱ्या अडचणी, अडथळे, व्याधी, पीडा, आजार व अन्य समस्या यांचे निवारण होते, असा अनेकांचा अनुभव आहे. आपणही तसा प्रयत्न करून पाहावा व आपणांसही तसा अनुभव आल्यास कृपया आम्हांस कळवावे.**

==================================================================

**(१) मेष -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत वक्री हर्षल व राहू असे दोन ग्रह असून येथील हे दोन्ही ग्रह महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुल असल्याचाच अनुभव येईल. राहूमुळे अनारोग्य, मानहानी होणे संभवते. तसे घडल्यास सूडभावना जोर करील. जपा. येथील हर्षलमुळे स्वभाव लहरी, अस्थिर, चंचल असा होणे संभवते. कोणाचाही धाक, दडपण सहन होणार नाही. पण त्याच्यामुळे शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना आपल्या संशोधन कार्यात मदत होईल व काही प्रमाणात प्रगती करणे व यश मिळविणे शक्य होईल. या राशीच्या धनस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचा आजार होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे सर्व प्रकारे आर्थिक समस्या त्रस्त करतील. या राशीच्या पंचम स्थानी सिंह राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत जात आहेत. पंचम स्थानी असलेल्या शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलाकारांना आपल्या कलेत प्रगती करणे शक्य होईल. पण येथील शुक्रही दिनांक २४ पासून या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर कलागुण असूनही तो व्यक्त करण्यास संधीच मिळणार नाही. रवि स्थानी असताना अनारोग्यकारकच होईल. तसेच मुलांपैकी कोणाच्या अनारोग्याची समस्या त्रस्त करील. नोकरीत वरिष्ठांचा जाच सहन करावा लागेल. प्रियजनांपैकी काहींचे दूरत्व निर्माण झाल्यास मन अस्वस्थ होईल. महिन्याच्या उत्तरार्धात हा रवि या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी कन्या राशीत प्रथमपासून वक्री बुध आहेच. तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे काही प्रमाणात कार्यसिद्धी होऊन

अर्थलाभही होईल. या राशीच्या सप्तम स्थानी तुळा राशीत केतु असून त्याच्यामुळे मनस्थिती अस्थिर होईल व विवाहितांच्या वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करील. या राशीच्या दशम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना व कोळसा,पोलाद यांचा व्यापार असणारांना तो अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या व्यय स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून दिनांक ११ पासून येथील नेपच्यून वक्र गतीने या राशीच्या लाभस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात तो प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे चिंता व मानसिक व्यग्रता यांच्यामुळे नैराश्य येईल. शिवाय आर्थिक समस्या त्रस्त करतील. व्ययस्थानी असलेला वक्री गुरु अध्यात्म व सामाजिक कार्य यांची मनापासून ओढ असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच प्रवासात अडचणी येण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर "श्रीगणेश" व "श्रीहनुमान उपासना" अनुकूल होईल व मनःशक्ती आणि मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळ स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र अश्विनी आहे त्यांनी "ओम अश्विनीकुमाराभ्यां नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र भरणी आहे त्यांनी "ओम यमाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी "ओम अग्नये नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(२) वृषभ -** या राशीच्या प्रथम(लग्न) स्थानी याच राशीत मंगळ असून त्याच्यामुळे उष्णताविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. त्याशिवाय स्वभाव अहंकारी, हट्टी झाल्यास, शरीरपीडा, अकारण श्रम, दगदग सहन करावी लागेल व थकावट जाणवेल. तसेच हा मंगळ नोकरदार मंडळींना मनस्तापदायक असल्याचाच अनुभव येईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून येथील रवि कौटुंबिक सुखाचे दृष्टीने प्रतिकुल होण्याचीच शक्यता दिसते. शिवाय तो अनारोग्यकारक होईल व नियोजित कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होतील. तसेच आर्थिक चिंताही त्रस्त करण्याची शक्यता दिसते. पण येथील शुक्रामुळे मनोनुकुल घटना घडतील व दिलासा मिळेल. शेतीवाडी असणारांना तो लाभदायक होईल. येथील रवि-शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या पंचम स्थानी कन्या राशीत जात आहेत. या स्थानी प्रथमपासून वक्री बुध आहेच. त्यामुळे

रवि -बुध हे दोन्ही ग्रह प्रतिकुलच होतील व त्यांच्यामुळे अनारोग्य, अपघात, नोकरीत वरिष्ठांचा जाच, कुटुंबातील प्रियजनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व अशापैकी कारणांनी मनस्थिती अस्वस्थ राहील. बुधामुळे कसली तरी भीती अस्वस्थ करील. त्याशिवाय संततीकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. पण शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना त्यांच्या कलेत प्रगती करणे सहज शक्य होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, मनस्थिती उदार होईल, कार्यक्षेत्रात सहकार्य लाभेल, व काही मंडळींना प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या भाग्यस्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो वकिली, तत्त्वज्ञान अशा प्रकारचे चिकित्सक बौद्धिक नोकरी-व्यवसाय असणारांना काही प्रमाणात अनुकुल व यशदायक होईल. त्याशिवाय काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या लाभस्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून दिनांक ११ पासून वक्र गतीने या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे आर्थिक नुकसान होणे संभवते. तसेच कुमार्गी मित्रांमुळे नुकसान होणे संभवते. त्यामुळे नैराश्य येणे संभवते. पण तो या राशीच्या दशम स्थानी कुंभ राशीत गेल्यावर मनस्थिती अस्थिर राहील; पण मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार-व्यवसाय असणारांना तो अनुकुल व लाभदायक होईल. या राशीच्या लाभस्थानी असलेल्या वक्री गुरुमुळे काही प्रमाणात इच्छाआकांक्षा पूर्ण होतील, अनेक मार्गांनी अर्थलाभ होणे संभवते, विवाहेच्छूना विवाहयोग संभवतो, विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या व्ययस्थानी मेष राशीत वक्री हर्षल व राहू असे दोन ग्रह असून येथील हर्षल पूर्णपणे प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे वाईट प्रसंग, आर्थिक चिंता, शत्रुत्व, बेअब्रू अशापैकी घटना घडणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे अपघात भयही आहे. जपा. पण येथील राहू काही प्रमाणात अनुकुल होईल; व त्याच्यामुळे हातून दिखाऊ आचरण घडण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर शिवशंकराची व श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालीसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र कृत्तिका आहे त्यांनी ओम अग्रये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र रोहिणी आहे त्यांनी "ओम ब्रह्माय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(३) मिथुन -** या राशीच्या तृतीय स्थानी सिंह राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात अनुकुल व लाभदायक होतील. रविमुळे सर्व सुख लाभेल. आरोग्य उत्तम राहील, धनलाभ होईल नोकरीत वरिष्ठ तुमच्या कामावर प्रसन्न होतील, काहींचा सन्मान होईल; तर क्वचित कोणास एखादे उच्च पदही मिळू शकेल. शुक्रामुळेही भूमिलाभ व धनलाभ होणे संभवते. पण महिन्याच्या उत्तरार्धात हे दोन्ही ग्रह या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत जात आहेत. त्या काळात रवि प्रतिकुल होईल व त्याचा परिणाम अनारोग्य होणे, कार्यदिरंगाई होणे, दुःख होणे, कौटुंबिक सुखात बाधा येणे, अशा घटना घडण्याची शक्यता दिसते. पण शुक्रामुळे ऐषाराम मिळेल, वैवाहिक जीवनातील सुख लाभेल व ज्यांची शेतीवाडी आहे अशांना त्यापासून लाभ होईल. या राशीच्या चतुर्थ स्थानी कन्या राशीत प्रथमपासून वक्री बुध आहेच. त्याच्यामुळेही काही प्रमाणात गृहसौख्य व मित्रसुख मिळेल. पण धननाश होण्याचीही शक्यता दिसते. जपा. या राशीच्या पंचम स्थानी तुळा राशीत केतू असून तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व यशदायक होईल. पण या राशीच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीत अडचणी, अडथळे निर्माण होतील. तसेच काही मंडळींना पोटविकाराचा आजार त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मकर या स्वराशीत वक्री शनि असून तो प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे दुःख,दैन्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना अनारोग्याला सामोरे जावे लागेल. शिवाय तो अपघातकारकही असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे आवश्यक होईल. या राशीच्या दशम स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून दिनांक ११ पासून वक्र गतीने या राशीच्या भाग्यस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत अस्थिर, चंचल अशी होणे संभवते. पण तो मनोवैज्ञानिक व द्रव पदार्थ व्यापार-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे काही मंडळींना सूचक स्वप्ने पडतील व अध्यात्मात रुची असणारांना उपासनेद्वारे आध्यात्मिक प्रगती करणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी असलेला वक्री गुरु बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना काही प्रमाणात अनुकुल, प्रगतिकारक व यशदायक होईल. शिवाय बौद्धिक संशोधन कार्यक्षेत्र असणारांपैकी काही मंडळींचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी मेष राशीत वक्री हर्षल व राहू असे दोन ग्रह असून हर्षलमुळे सर्व काही अनिश्चित असे घडेल. त्याशिवाय मित्रांशी वाद, भांडणे होणे संभवते.

येथील राहूमुळे संततीविषयक चिंता  त्रस्त  करील.  शिवाय ज्यांच्या हाती अधिकार आहे त्यांपैकी काही मंडळींना अधिकाराचा दुरुपयोग करून वाममार्ग धन प्राप्त करण्याचा मोह अस्वस्थ करील.  या राशीच्या व्ययस्थानी वृषभ राशीत मंगळ  असून  तो पूर्णपणे प्रतिकुल  होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, वाद, भांडणे होणे संभवते. शिवाय आर्थिक चिंताही त्रस्त  करण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर  दररोज सकाळी स्नान झाल्यावर  मनापासून श्रद्धेने "श्रीजगदंबा  माता दुर्गा देवी स्तोत्रा "चे  पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना  मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मृग आहे त्यांनी "ओम सोमसोमाय नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र  आर्द्रा  आहे त्यांनी "ओम नमः शंकराय " तारक  मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र  पुनर्वसू आहे त्यांनी "ओम  अदितीये नमः"  तारक  मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(४) कर्क -** या राशीच्या धनस्थानी सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत जात आहेत. त्यामुळे रवि  ग्रह महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, वाद, भांडणे होणे, आर्थिक हानी होणे,  आर्थिक चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडण्याची  शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात  तो अनुकुल  होईल व त्याच्यामुळे आरोग्य उत्तम राहील, सर्व प्रकारे सुखसमाधान लाभेल, नोकरीत वरिष्ठ प्रसन्न  होतील  व काही मंडळींचा सन्मान होणे संभवते. येथील शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल, सुखकारक व लाभदायक होईल. शिवाय त्याच्यामुळे कौटुंबिक सुख लाभेल, काही मंडळींना भूमिलाभ होईल तर काही मंडळींना  प्रतिष्ठा प्राप्त होईल.  या राशीच्या तृतीय स्थानी कन्या राशीत प्रथमपासून वक्री बुध असून तो  दिनांक १४ पासून      अस्तंगत  होत आहे. त्यामुळे तोही प्रतिकुलच होईल.  या राशीच्या चतुर्थ स्थानी तुळा  राशीत केतू असून  त्याच्यामुळे घरीदारी कोणाशी पटणार नाही, कसली  तरी चिंता  अस्वस्थ करील, शिवाय तो विषभयकारक असल्याने खाण्यापिण्याची काळजी घ्यावी लागेल. या राशीच्या सप्तम स्थानी मकर राशीत वक्री शनि  असून त्याच्यामुळे चित्तवृत्ती अस्वस्थच राहील. विवाहेच्छूना विवाहयोग संभवत नाही. या राशीच्या  भाग्यस्थानी  स्थानी मीन  राशीत वक्री गुरु  व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील वक्री नेपच्यून दिनांक ११ पासून वक्र गतीने या राशीच्या अष्टम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो अध्यात्मात  रुची  असणारांना अनुकुल  होईल.  पण  नंतर  तो  प्रतिकुल  होऊन  जलभयकारक   व विषभयकारक   होईल. या

राशीच्या भाग्यस्थानी मीन राशीत असलेला वक्री गुरुसुद्धा अनुकुल होईल व त्याच्यामुळे सुद्धा अध्यात्मात प्रगती होणे शक्य दिसते. या राशीच्या दशम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षल काही प्रमाणात उच्च बौद्धिक व शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. येथील राहूही अनुकुल होईल व शासकीय नोकरीत असणारांपैकी काही मंडळींना अधिकारपद मिळू शकेल; तर क्वचित कोणाचा सन्मान होणेही संभवते. या राशीच्या लाभस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे कष्ट परिश्रम करूनच अर्थलाभ होईल. शिवाय त्याच्यामुळे मित्रांशी वितुष्ट येणे संभवते. जपा. पण त्याच्यामुळे काही मंडळींना मौल्यवान वस्तू प्राप्त होणे संभवते. श्रद्धा असेल तर श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची आणि श्रीशिवशंकराची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे आणि " बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पुनर्वसू आहे त्यांनी "ओम अदितीये नमः:" मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पुष्य आहे त्यांनी "ओम बृहस्पतये नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र आश्लेषा आहे त्यांनी "ओम सर्पाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(५) सिंह -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या धनस्थानी कन्या राशीत जात आहेत. त्यामुळे रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे अनारोग्य, मनस्ताप, पीछेहाट होणे, आर्थिक समस्या त्रस्त करणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता दिसते. पण शुक्रामुळे वैवाहिक आणि कौटुंबिक सुखसमाधान लाभेल, तसेच धनलाभ होणेही संभवते. या राशीच्या तृतीय स्थानी तुळा राशीत केतु असून तो मानसिक दुःखदायकच होईल. या राशीच्या षष्ठ स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे गैरसमजुतीने भांडणे होतील, शत्रुत्व निर्माण होईल, शिवाय तो अनारोग्यकारकही होईल. या राशीच्या अष्टम स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोंन ग्रह असून येथील वक्री नेपच्यून दिनांक ११ पासून या राशीच्या सप्तम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात तो जलभयकारक व विषभयकारक होणे संभवते. जपा. महिन्याच्या उत्तरार्धात तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर वैवाहिक जीवनातील सुखात बाधा निर्माण करण्याची शक्यता

दिसते. पण अष्टम स्थानी असलेल्या गुरुमुळे ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काही मंडळींना असा अचानक धनलाभ होण्याची शक्यता दिसते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होऊ शकेल. या राशीच्या भाग्यस्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील हर्षल शास्त्रीय संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल. तसेच त्याच्यामुळे काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे तर काही मंडळींना परदेशगमनाचे योग येण्याची शक्यता दिसते. राहूमुळे सभाधीटपणा येईल व प्रभावी भाषण करणे शक्य होईल. या राशीच्या दशम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो औषधविक्रेते व यांत्रिकतांत्रिक नोकरी-व्यवसाय असणारांना अनुकुल व लाभदायक होईल. पण इतरांच्या व्यवसायात खळबळजनक घटना घडणे संभवते. या राशीच्या नोकरदार मंडळींना नोकरीत कामाचा ताण व वरिष्ठांचा जाच सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. श्रद्धा असेल तर "श्रीभगवान विष्णूची उपासना " अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. म्हणून दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "विष्णुसहस्रनाम स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मघा आहे त्यांनी "ओम पितराय नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वा आहे त्यांनी "ओम भगाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी " ओम आर्यमे नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(६) कन्या -** या राशीच्या व्ययस्थानी सिंह राशीत रवि व शुक्र असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत जात आहेत. अशा परीस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्यामुळे शरीरपीडा होणे, मानभंग होणे, अनारोग्य होणे, मनस्ताप सहन करावा लागणे, कसली तरी चिंता त्रस्त करणे अशापैकी घटना घडणे सांभवते. पण येथील शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व सर्व प्रकारे सुखदायकच होईल. या राशीच्या धनस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे आर्थिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे स्वभाव स्वार्थी, संशयी होईल; बुद्धी व्यवहारी होईल; पण
त्याच्यापाशी चिकाटीचा गुण असल्यामुळे चिकित्सक बौद्धिक कार्यक्षेत्र असणारांना तो अनुकुल व प्रगतिकारक होईल. या राशीच्या सप्तम स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह

असून येथील नेपच्यून दिनांक ११ पासून वक्र गतीने या राशीच्या षष्ठ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. पण नंतर तो या राशीच्या षष्ठ स्थानी गेल्यावर या राशीच्या काही मंडळींना कसल्या तरी आजाराची भावना त्रस्त करील. काही मंडळींना काल्पनिक चिंता अस्वस्थ ठेवील. पण सप्तम स्थानी असलेला वक्री गुरु काही प्रमाणात अनुकुल होईल व त्याच्यामुळे नवे स्नेहसंबंध जुळून येतील, प्रवास योग येणे संभवते, काही विवाहेच्छूना विवाहयोग येईल. शिवाय अर्थलाभ होण्याचीही शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असून येथील राहू अनारोग्यकारक होईल व काही मंडळींना वाम मार्ग धन मिळविण्याचा मोह त्रस्त करील. पण येथील वक्री हर्षल अपघातकारक असल्यामुळे सतत सावधानतेने आचरण करणे अगत्याचे होईल. या राशीच्या भाग्यस्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे प्रवासात त्रास , मानहानी होण्याची शक्यता दिसते. त्यामुळे शक्यतो प्रवास करू नका. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीदुर्गा देवी स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तरा आहे त्यांनी “ओम आर्यमे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र हस्त आहे त्यांनी “ ओम सूर्याय नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी “ओम त्वष्टे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(७) तुळा -** या राशीच्या प्रथम (लग्न) स्थानी याच राशीत केतु असून तो सुखकारक होईल; पण वाहन-धोका कारक असल्यामुळे रस्त्याने चालताना व वाहन चालवताना सतत सावधान राहून नियंत्रित वेगातच चालवा. या राशीच्या चतुर्थ स्थानी मकर राशीत वक्री शनि असून तो दुःखदायकच होईल व त्याच्यामुळे गृहसौख्यहानी होणे संभवते. जपा. या राशीच्या षष्ठ स्थानी मीन राशीत वक्री गुरु आणि वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील वक्री नेपच्यून दिनांक ११ पासून या राशीच्या पंचम स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात काल्पनिक चिंता त्रस्त करण्याची शक्यता दिसते. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होणे संभवते. पण तो गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना व अध्यात्मात रुची असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होऊ शकेल. षष्ठ स्थानी असलेल्या वक्री गुरुमुळे आरोग्य फारसे बिघडणार नाही. या राशीच्या सप्तम स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून येथील राहूमुळे कपटी विचार

अस्वस्थ करतील. तसेच येथील राहू व हर्षल हे दोन्ही ग्रह वैवाहिक जीवनातील सुखात व भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांच्या भागीदारीत बाधा निर्माण करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारकच होईल शिवाय त्याच्यामुळे हाडमोड होणेही संभवते. तसेच त्याच्यामुळे वीज-पाणी यांपासून धोका असल्यामुळे खोल पाण्यात पोहणे धोक्याचे होईल. तसेच विजेची उपकरणे काळजीपूर्वक हाताळणे आवश्यक होईल. या राशीच्या लाभस्थानी सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या व्ययस्थानी कन्या राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत शुक्र संपूर्ण महिन्याच्या काळात अनुकुल व सुखदायकच होईल; पण रवि केवळ महिन्याच्या पूर्वार्धातच अनुकुल व लाभदायक होईल. महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे प्रतिकुल परिस्थिती निर्माण होईल व शरीरपीडा होऊन मानभंग होणेही संभवते. श्रद्धा असेल तर "श्रीशिवशंकराची" आणि "श्रीहनुमानाची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने "शिवलीलामृत स्तोत्रा"चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी "हनुमानचालिसा स्तोत्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र चित्रा आहे त्यांनी "ओम त्वष्टे नमः" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र स्वाती आहे त्यांनी "ओम वायवे नमः" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी "ओम इंद्राग्नये नमः" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(८) वृश्चिक** - या राशीच्या तृतीय स्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे काही मंडळींना मनपसंत अशी नवी नोकरी किंवा आवडते कार्यक्षेत्र मिळण्याची शक्यता दिसते. पण त्याच्यामुळे भावंडविषयक एखादी चिंता अस्वस्थ करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या पंचम स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह आहेत. पैकी येथील नेपच्यून दिनांक ११ पासून वक्र गतीने या राशीच्या चतुर्थ स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात त्याच्यामुळे मनस्थिती अति भावनाशील होईल, पण तो अध्यात्म व गूढ संशोधन कार्यात कार्यरत असणारांना काही प्रमाणात अनुकुल व प्रगतिकारक होण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या उत्तरार्धात त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात गैरसमज, वाद, भांडणे, घोटाळे अशापैकी कारणांनी गृहसौख्यात बाधा निर्माण होणे संभवते. जपा. पंचम स्थानी असलेल्या वक्री गुरुमुळे अर्थलाभ होणे, सर्व सुख

मिळणे, प्रेमसंबंध असतील तर ते घट्ट होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे या राशीच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रगती करणे शक्य होईल. पण गुरु वक्री असल्यामुळे वरील गोष्टीत अपेक्षापूर्ती होईलच याची खात्री देता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून राहूमुळे अनारोग्याचा त्रास सहन करावा लागेलसे दिसते. पण त्याच्यामुळे ज्यांचा परधर्मियांशी व्यावसायिक संबंध आहे अशांना अशा संबंधामुळे तो लाभदायक होईल. पण येथील वक्री हर्षलमुळे मनस्थिती अति चंचल होणे संभवते. या राशीच्या मंडळींनी सतत खोल विचार करत बसू नये. नपेक्षा डोकेदुखी किंवा मेंदूविकाराचे अनारोग्य सहन करावे लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या सप्तम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्वतःचे किंवा जीवनसाथी/संगिनीचे अनारोग्य, दोघामधील वाद, भांडणे, मतभेद अशापैकी कारणांनी वैवाहिक जीवनातील सुखात बाधा येणे संभवते. तसेच भागीदारीत व्यापार-व्यवसाय असणारांनी वरील कारणांमुळेच भागीदारीत बाधा येणार नाही याची काळजी घ्यावी. या राशीच्या दशम स्थानी सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून ते दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या लाभस्थानी कन्या राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्या संपूर्ण काळात रवि अनुकुल, प्रगतिकारक, लाभदायक व सुखकारक होईल. पण शुक्रामुळे महिन्याच्या पूर्वार्धात कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांच्या कार्यात अडचणी, अडथळे निर्माण होण्याची शक्यता दिसते. पण महिन्याच्या अखेरच्या सप्ताहात हा शुक्र या राशीच्या लाभस्थानी गेल्यावर अनुकुल होईल व सुख, ऐषाराम लाभेल. या राशीच्या व्यय स्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे स्वभाव अतिशय लहरी, विक्षिप्त होण्याची शक्यता आहे. श्रद्धा असेल तर श्रीगणेश व श्रीहनुमान उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “श्रीगणेश अथर्वशीर्ष स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र विशाखा आहे त्यांनी “ओम इंद्राग्रये नमः” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र अनुराधा आहे त्यांनी “ओम मित्राय नमः” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र ज्येष्ठा आहे त्यांनी “ओम इंद्राय नमः” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(९) धनु** - या राशीच्या धनस्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात मन अस्वस्थ करण्याऱ्या घटना घडण्याची शक्यता जाणवते. त्याशिवाय आर्थिक समस्याही त्रस्त

करण्याची शक्यता दिसते. या राशीच्या चतुर्थ स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून वक्री गुरुमुळे अपेक्षित असे कौटुंबिक सुखसमाधान मिळेलच याची खात्री देता येत नाही. पंण नातेसंबंधातील कोणाकडून तरी मनस्ताप दिला गेल्यास त्या कौटुंबिक सुखात बाधा येण्याचीच दाट शक्यता दिसते. पण या गुरुमुळे ज्यांचे स्थावर खरेदीविक्रीचे व्यवहार होणार आहेत ते पुष्कळ प्रमाणात सुखाचेच घडतील. येथील वक्री नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या तृतीय स्थानी कुंभ राशीत जात आहे. त्या काळात त्याच्यामुळे मनस्थिती अत्यंत भावनाशील होईल; पण तो अध्यात्माची ओढ असणारांना व गूढ सांशोधन कार्यात कार्यरत असणारांना अनुकुल व प्रगतिकारक होईल; पण त्या कार्यात अडचणी, अडथळे येणे संभवते. तसेच या वक्री नेपच्यूनमुळे काही मंडळींना जलप्रवासाचे तर काहींना परदेशवारीचे योग येतील. पण तो वक्री असल्याने त्यात अडचणी, अडथळें येण्याची शक्यता नाकारता येत नाही. या राशीच्या पंचम स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे संततिसुखात बाधा येणे संभवते. तसेच या राशीच्या विद्यार्थ्याच्या शिक्षणात अडचणी निर्माण होणे संभवते. पण येथील हर्षल कलापोषक व उच्च बौद्धिक कार्यक्षेत्रास अनुकुल असला तरी तो वक्री असल्याने तो किती प्रमाणात प्रगतिकारक होईल ते सांगता येत नाही. या राशीच्या षष्ठ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून तो अनारोग्यकारकच होईल शिवाय त्याच्यामुळे काही मंडळींना अपप्रचाराचा त्रास सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच घरी चोरी होणेही संभवते. जपा. या राशीच्या भाग्यस्थानी सिंह राशीत रवि आणि शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या दशम स्थानी कन्या राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत येथील रवि महिन्याच्या पूर्वार्धात प्रतिकुल होईल; तर शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात प्रतिकुल होईल. महिन्याच्या पूर्वार्धात रविमुळे कसली तरी चिंता, भय ,वडील मंडळींचा विरोध सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. पण शुक्रामुळे सुख, ऐषाराम, काही मंडळींना प्रसिद्धी मिळण्याची शक्यता दिसते.पण महिन्याच्या उत्तरार्धात रवि अनुकुल झाल्यावर नोकरी-व्यवसायात लाभदायक घटना घडतील. उलट शुक्रामुळे कलात्मक नोकरी-व्यवसाय असणारांना अडचण, अडथळे सहन करतच काळ व्यतीत करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या लाभस्थानी तुळा राशीत केतु असून तो अनुकुल होईल व त्याच्यामुळे यश, सुख, धन लाभेल व काही मंडळींना प्रवास योग येईल. श्रद्धा असेल तर “श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना “ अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान

झाल्यावर मनापासून श्रद्धेने "बावन्न श्लोकी गुरुचरित्रा"चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र मूळ आहे त्यांनी "ओम निऋतये नमः:" तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाषाढा आहे त्यांनी " ओम उदकाय नमः:" तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी "ओम विश्वेदेवाय नमः:" तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१०) मकर -** या राशीच्या प्रथम (लग्न)स्थानी याच राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे अनारोग्य, नैराश्य, नियोजित कार्यात अडथळे, कुटुंबातील प्रिय जनांपैकी कोणाचे होणारे दूरत्व अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागेलसे दिसते. पण काही मंडळींना दूरच्या प्रवासाचे योग येतील. या राशीच्या तृतीय स्थानी मीन राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या धनस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे तो केवळ महिन्याच्या प्रथम दशकातच अध्यात्म व गूढ संशोधन कार्यक्षेत्र असणारांना अनुकुल होईल; पण नंतर तो धनस्थानी गेल्यावर आर्थिक समस्या त्रस्त करण्याची शक्यता दिसते. येथील वक्री गुरुमुळे या राशीच्या लेखकांना लेखनकार्यात अडचणी, अडथळे सहन करतच प्रगती करावी लागेल. त्याशिवाय त्याच्यामुळे एखाद्या भावंडाकडून मनस्ताप दिला जाणे संभवते. पण प्रवासाचे योग संभवतात. या राशीच्या चतुर्थ स्थानी मेष राशीत राहू व वक्री हर्षल असे दोन ग्रह असून राहूमुळे कौटुंबिक त्रास, वाद, भांडणे अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. तसेच येथील वक्री हर्षलमुळेही कोणाशी पटणार नाही, कशातही सुखसमाधान लाभणार नाही, उलट सतत तक्रारी करत राहाल. या राशीच्या पंचम स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे स्थावरसंबंधी त्रास, अनारोग्य, संततीकडून दिला जाणारा मनस्ताप अशापैकी कारणांनी असह्य मनस्ताप सहन करावा लागण्याची शक्यता दिसते. या राशीच्या अष्टम स्थानी सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या भाग्यस्थानी कन्या राशीत जात आहेत. अशा परिस्थितीत रवि महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होणार असून त्याच्यामुळे दुःख, भय, निराशा, अनारोग्य, मानसिक ताण, विरोध, अपयश अशापैकी मनस्ताप देणाऱ्या घटना घडण्याची शक्यता दिसते. पण शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व सुखकारकच होईल. काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल, ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशापैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे

संभवते.  काही मंडळींना वारसा हक्काने असा धनलाभ होऊ शकेल .त्याशिवाय काही मंडळींना गुरुकृपा तर काहींना थोरकृपा प्राप्त होणे संभवते. क्वचित कोणास प्रसिद्धी मिळणेही संभवते. या राशीच्या दशम स्थानी तुळा  राशीत केतू असून त्याच्यामुळे काही मंडळींना हातची नोकरी सोडून नवीन काही करण्याची  ऊर्मि येईल. पण त्यांनी कटाक्षाने तो मोह टाळावा व आहे ती  नोकरीच मनापासून करावी. श्रद्धा असेल तर “श्रीशिवशंकरा”ची  व “श्रीहनुमाना”ची उपासना अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती  लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “हनुमानचालीसा स्तोत्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराषाढा आहे त्यांनी “ओम विश्वेदेवाय नमः:”  तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र श्रवण आहे त्यांनी “ ओम विष्णवे  नमः:’ तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(११) कुंभ -** या राशीच्या धनस्थानी मींन  राशीत वक्री गुरु व वक्री नेपच्यून ते दोन ग्रह असून येथील नेपच्यून  महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी  याच राशीत जात आहे. त्यामुळे तो महिन्याच्या संपूर्ण काळात प्रतिकुलच होईल व त्याच्यामुळे आर्थिक संकटे त्रस्त करतील. त्यामुळे मानसिक संवेदना अति जलद होतील व मनाविरुद्ध थोडे काहीही घडले तर लगेच गहिरे नैराश्य येईल.  धनस्थानी असलेल्या वक्री गुरुमुळे कौटुंबिक जीवनात शुभ घटना घडण्याची शक्यता दिसते. शिवाय बऱ्यापैकी अर्थलाभही होईल. या राशीच्या तृतीय स्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असून  तेथील राहू अनुकुल असला तरी त्याच्यामुळे बंधुसुखात  बाधा निर्माण होणे संभवते. येथील वक्री हर्षलमुळे उच्च बौद्धिक, आकलन व स्मरणशक्ती प्राप्त होईल;पण तो वक्री असल्याने अपेक्षित प्रगती साधता येईलच याची खात्री देता येत नाही. पण त्याच्यामुळे काही मंडळींना परदेशगमनाची संधी मिळण्याची शक्यता दिसते.  या राशीच्या चतुर्थ स्थानी वृषभ राशीत मंगळ असून त्याच्यामुळे वाद, भांडणे, गैरसमज, असमाधानकारक घटना  अशापैकी कारणांनी  कौटुंबिक सुखात बाधा येणे संभवते. जपा. या राशीच्या सप्तम स्थानी रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात  या राशीच्या अष्टम स्थानी कन्या राशीत जात आहेत. त्यामुळे  येथील रवि संपूर्ण महिन्याच्या काळात प्रतिकुलच   होईल व त्याच्यामुळे अनारोग्य होणे, इच्छाआकांक्षा अपूर्ण

राहणे, दुःख, नियोजित कार्यात अपयश येणे, संततिसुखात बाधा येणे अशापैकी घटना घडण्याची शक्यता आहे. पण येथील शुक्र महिन्याच्या संपूर्ण काळात अनुकुल व लाभदायकच होईल. त्याच्यामुळे प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान प्राप्त होईल, काही मंडळींना कमी श्रमात अपेक्षेपेक्षा अधिक अर्थलाभ होईल, तर ज्यांच्या जन्मकुंडलीत अचानक धनलाभ योग आहे अशांपैकी काहींना असा अचानक धनलाभ होणे संभवते. काही मंडळींना वारसा हक्काने असा अचानक धनलाभ होईल. पण हा शुक्र महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या वृद्ध मंडळींना प्रतिकुलच होईल. या राशीच्या भाग्यस्थानी तुळा राशीत केतू असून त्याच्यामुळे सतत धूर्त, ढोंगी आचरण होणे संभवते. शिवाय त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येण्याची शक्यताही दिसते. या राशीच्या व्ययस्थानी मकर राशीत वक्री शनि असून त्याच्यामुळे जीवनात विविध अडचणी, आर्थिक संकटे, मानहानी होणे संभवते. श्रद्धा असेल तर दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवशंकरा” ची व “श्रीहनुमाना”ची उपासना करा. ती अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती प्राप्त होईल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “शिवलीलामृत स्तोत्रा”चे पठण करा. रात्री झोपी जाण्यापूर्वी “श्रीहनुमानचालिसा स्तोत्रा” चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र धनिष्ठा आहे त्यांनी “ओम वसवे नमः:” तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र शततारका आहे त्यांनी “ओम वरुणाय नमः:”तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम अजैकचरणाय नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

**(१२) मीन -** या राशीच्या प्रथम(लग्न)स्थानी याच राशीत वक्री गुरु आणि वक्री नेपच्यून असे दोन ग्रह असून येथील वक्री नेपच्यून महिन्याच्या उत्तरार्धात वक्र गतीने या राशीच्या व्ययस्थानी कुंभ राशीत जात आहे. त्यामुळे महिन्याच्या पूर्वार्धात या राशीच्या मंडळींची मनस्थिती अति कोमल, होईल व मानसिक संवेदना अति जलद होतील. आणि लगेच नैराश्य येईल. त्याच्यामुळे महिन्याच्या उत्तरार्धात मानसिक चिंता त्रस्त करतील. या राशीच्या धनस्थानी मेष राशीत राहू आणि वक्री हर्षल असे दोन ग्रह असून येथील राहूमुळे कौटुंबिक जीवनात वाद, भांडणे होणे संभवते. त्याशिवाय आर्थिक चिंतांमुळेही मनस्थिती अस्वस्थ होण्याची शक्यता दिसते. येथील वक्री हर्षलमुळे बुद्धी अति अस्थिर, चंचल अशी घडेल व अविचाराने खर्च होणे संभवते. शिवाय हातून विचित्र आचरण घडेल व

आपल्या फटकळ  बोलण्याने समोरच्याचा अपमान होत आहे याचे भानही राहणार नाही.     या राशीच्या तृतीय स्थानी वृषभ राशीत मंगळ  असून तो अनुकुल  होईल व त्याच्यामुळे धैर्य, हिंमत, महत्त्वाकांक्षा वाढेल.  हातून एखादे कर्तृत्व घडेल. पण त्याच्यामुळे इजा होणेही संभवते. या राशीच्या षष्ठ स्थानी  सिंह राशीत रवि -शुक्र असे दोन ग्रह असून हे दोन्ही ग्रह महिन्याच्या उत्तरार्धात या राशीच्या सप्तम स्थानी  कन्या राशीत जात आहेत. त्यामुळे महिन्याच्य पूर्वार्धात रवि  दशम या व्यवसाय स्थानास पूरक होईल. व हितशत्रू पराभूत होतील. पण महिन्याच्या उत्तरार्धात तो अनारोग्यकारक होणे संभवते. या राशीच्या  षष्ठ स्थानी असलेल्या   शुक्रामुळे सर्व प्रकारच्या कलावंत मंडळींना  आपल्या कलेतील प्रगती दाखविण्यास संधीच मिळणार नाही. पण तो या राशीच्या सप्तम स्थानी गेल्यावर या राशीच्या प्रेमिकांचे प्रेमविवाह होतील, व  विवाहितांना वैवाहिक जीवनातील सुखसमाधान लाभेल. या राशीच्या अष्टम स्थानी तुळा राशीत केतू असून तो अनारोग्यकारक होईल व त्याच्यामुळे कौटुंबिक जीवनात  वाद, भांडणे होणे संभवते. शिवाय त्याच्यापासून अपघात भयही आहे. जपा. या  राशीच्या लाभस्थानी मकर राशीत वक्री शनि  असून तो काही प्रमाणात अनुकुल  होईल; पण त्याच्यामुळे संततिसुखात बाधा येणे संभवते.  श्रद्धा असेल तर “श्रीगुरुदेव दत्तात्रेयाची उपासना “ अनुकुल होईल व मनःशक्ती व मनःशांती लाभेल. त्यासाठी दररोज सकाळी स्नान झाल्यावर मनापासून श्रद्धेने “बावन्न श्लोकी गुरुचरित्रा”चे पठण करा. त्याशिवाय दररोज सकाळी स्नान करताना मनापासून श्रद्धेने ज्यांचे जन्मनक्षत्र पूर्वाभाद्रपदा आहे त्यांनी “ओम  अजैकचरणाय नमः:”  तारक मंत्राचा, ज्यांचे जन्मनक्षत्र उत्तराभाद्रपदा आहे  त्यांनी “ओम अहिर्बुध्न्याय  नमः:” तारक मंत्राचा आणि ज्यांचे जन्मनक्षत्र रेवती आहे त्यांनी “ओम पूषाय  नमः:” तारक मंत्राचा १०८ वेळा जप करावा.

=====ooooooooooo=====